*Appendix XIV (iii)*, **(Vide Article - 14.01 (v))**

महाराष्ट्र राज्याबाहेरुन या राज्यात स्थलांतर होणारे व तत्सम दुग्धव्यावसायीक लोकांच्या पाळीव जनावरांचे वन क्षेत्रातील अवैध चराईवर निर्बंध करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्रमांक : एमएफपी-२०११/प्र.क्र.२४८/फ-१

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०११.

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्यात गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड व राजस्थान राज्यातुन मोठया प्रमाणावर काठेवाडी व तत्सम दुग्धव्यावसायिकांची पाळीव जनावरे महाराष्ट्र राज्याच्या वनक्षेत्रात चराईकरीता येत असून त्यांचे उपद्रवमुल्य मोठया प्रमाणावर जाणवत आहे. काठेवाडी व तत्सम दुग्धव्यावसायिकांच्या पाळीव जनावरांमुळे महाराष्ट्र राज्यातील पाळीव जनावरे तसेच वन्यप्राण्यांनाही रोगराईची बाधा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. वनक्षेत्रातील वनचराई संदर्भात जमाबंदीची कार्यवाही यापूर्वीच करण्यात आलेली आहे. त्यानंतर सन २००८ च्या दरम्यान मेंढीचराईकरीता देखील काही क्षेत्र उपलब्ध करण्यात आले होते. वनक्षेत्रात पाळीव जनावरांची चराई करण्यासंदर्भात शासनाने प्राधान्यक्रम देखील निश्चित केला आहे. या सर्व शासन निर्णयाची अंमलबजावणी करताना असे लक्षात आले आहे की, आज महाराष्ट्र राज्याच्या वनक्षेत्रात राज्याबाहेरील पाळीव जनावरांना चराई करण्याकरीता योग्य असे वनक्षेत्र शिल्लक राहिलेले नाही. याशिवाय महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर अतिसंवेदनशील व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्याचे क्षेत्र अधिसूचित केलेले आहे. तेथे असणाऱ्या वन्यप्राण्यांमध्ये तोंडखुरी / पायखुरी (Foot and Mouth Disease) व पशुमारी (Rinderpest) सारख्या रोगांमुळे दगावण्याची भिती असते. वास्तव अशा क्षेत्रात पाळीव जनावरांची चराई होणे वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हितावह नाही.

३. परराज्यातील काठेवाडी आणि तत्सम दुग्धव्यावसायिकांची जनावरे नवीन लागवड क्षेत्रात आणि वनक्षेत्रात अनिर्बंध चराई करीत असल्याच्या घटना देखील निदर्शनास आलेल्या आहेत. त्यामुळे नैसर्गिक पुनरुत्पादनावर विपरित परिणाम होऊन रानमोडी, रानतुळस, रायमुनिया (घाणेरी) सारख्या अखाद्य प्रजातींची मोठया प्रमाणावर वाढ होऊन मर्यादित असलेल्या चराई क्षेत्रात आणखीनच घट होते. त्याचबरोबर वनाची नैसर्गिक वाढ होण्यास मर्यादा येतात. या परिस्थितीत महाराष्ट्र राज्यात परराज्यातून येणाऱ्या काठेवाडी आणि तत्सम दुग्धव्यावसायिकांकरीता वनक्षेत्रात चराई करणेवर कडक निर्बंध घालणे आवश्यक ठरलेले आहे.

शासन निर्णय :- या पार्श्वभूमीचा सर्वंकष विचार करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

महाराष्ट्र राज्यात प्रवेश करणाऱ्या परराज्यातील काठेवाडी आणि तत्सम दुग्धव्यावसायिकांनी खालील बाबींची पूर्तता केल्याशिवाय त्यांच्या पाळीव जनावरांना प्रवेश देण्यात येऊ नये.

१. जनावरांचे लसीकरण अनिवार्य

सदरहू पाळीव जनावरांच्या कळपातील प्रत्येक जनावराने या राज्यात प्रवेश करतांना तोंडखुरी / पायखुरी (Foot and Mouth Disease) आणि पशुमारी (Rinderpest) सारख्या रोगांपासून रोगप्रतिबंधक लस टोचलेली असावी. लस टोचण्याची तसेच ती लस प्रभावी होण्यासाठी आवश्यक कालावधी झालेला असण्याची खात्री वन विभाग व पशुसंवर्धन विभागाचे स्थानिक अधिकारी करतील. यासाठी राज्य सीमेवर आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात संसर्गरोध शाळेची (Quarantine) व्यवस्था करावी. याशिवाय अशा सर्व गुरांना मालकाच्या खर्चाने कर्ण टाचण (Ear Tags) लावण्यात यावेत. यांची पडताळणी वनविभाग आणि पशुसंवर्धन विभागाचे स्थानिक अधिकारी करतील.

२. चारा उपलब्धता दाखला अनिवार्य

या पाळीव जनावरांना ज्या खाजगी मालकीच्या क्षेत्रात पडाव टाकणेचा आहे त्या खातेदाराचे संमती पत्र, जमीनीचे भूदस्तऐवज (७/१२, ८अ दाखले) सादर करावे. या दस्तऐवजाची राज्यसीमेवरील प्रादेशिक वनक्षेत्रपाल या विषयाची प्रत्यक्ष पडताळणी करतील आणि त्यानंतरच महाराष्ट्र राज्यात प्रवेश देण्याबाबत योग्य तो निर्णय घेतील.

३. या पाळीव जनावरांच्या कळपामध्ये शेळी आणि मेंढी यांचा समावेश असणार नाही.

४. महाराष्ट्र राज्याचे मध्यप्रदेश, गुजरात या सीमेवर जे प्रचलित प्रवेशमार्ग आहेत तेथे अहोरात्र वनक्षेत्रपाल यांचे देखरेखीखाली टेहळणी पथक नियुक्त करण्यात यावेत. त्यांनी या सीमेलगतच्या क्षेत्रात गस्त घालून वरील अटी पूर्ण न करणाऱ्या व्यक्तींविरुध्द कायदेशीर कार्यवाही तात्काळ आयोजावी. तसेच सदर जनावरे राखीव वनक्षेत्रात अवैध चराई करतांना आढळल्यास भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१) (डी) आणि कलम २६ (१) (एक) अन्वये संबंधीत गुन्हेगारास अटक करावी व अवैध चराई करुन आलेल्या गुरांना जप्त करुन तसा अहवाल कलम ५२(२) खाली हद्दीचे प्रथम श्रेणी न्यायाधिश यांच्याकडे त्वरित सादर करावा. विद्यमान परिस्थिती विचारात घेवून सदर जप्त केलेल्या जनावरांची जवळचे शासकीय / जिल्हा परिषदेचे पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी तपासणी करुन घ्यावी व तपासणी अहवालाच्या आधारावर आवश्यक वाटल्यास भारतीय वन अधिनियमाचे कलम ५८ प्रमाणे विल्हेवाट लावावी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यास त्याबद्दल माहिती द्यावी. कोणत्याही परिस्थितीत जनावरांचा अवैधरित्या वनक्षेत्रात प्रवेश होणार नाही हे लक्षात घ्यावे. वरीलप्रमाणे नोंदविलेल्या वनगुन्ह्याबाबत चौकशी तातडीने पूर्ण करुन कलम ५५ (१) अ किंवा यथास्थितीत कलम ६१ अ अंतर्गत गुरे सरकार जमा करण्यासाठी संबंधित न्यायालय किंवा प्राधिकृत अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करावा. न्यायालयात खटला दाखल केल्या

प्रकरणी फिर्याद अर्जात कलम २६ (१) खाली आरोपीस शिक्षा देणे, वनक्षेत्रात अवैध चराईमुळे झालेल्या नुकसानीची वसुली आरोपीकडून वसुल होणे तसेच प्रथम कलम ६६ खाली समरी ट्रायल (Summary Trial) म्हणून निकाली काढण्याबाबतची बाब समाविष्ट करावी. कलम २६(१) खाली आरोपींना शिक्षा होणेकरिता राखीव वनात झालेल्या सदर अवैध चराईमुळे शासनास झालेल्या नुकसानीची रक्कम आरोपीकडून वसूल करण्याकामी आदेश देण्याबाबत न्यायालयाकडे विनंती करावी.

२. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता राज्याच्या सीमेवरील सर्व जिल्ह्यात खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| २) | पोलीस अधिक्षक | : | सदस्य |
| ३) | उप संचालक (पशुसंवर्धन) | : | सदस्य |
| ४) | उप वनसंरक्षक | : | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक दर महिन्यात घेण्यात यावी. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी दर १५ दिवसांनी त्यांचे वन वृत्तातील काठेवाडी व तत्सम दुग्धव्यावसायिकांच्या मार्फत जनावरांचे उपद्रवाचा आढावा घेणेत यावा. अशा अनधिकृत जनावरांना राज्याचे बाहेर नेऊन सोडणेचे कामाकरिता योजनेत्तर इतर खर्चातील तरतूदीचा वापर करणेत यावा. दर महिन्यात प्रत्येक वनक्षेत्रपाल यांनी अवैध वनचराईची दखल घेणे अनिवार्य आहे. त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये एकही अवैध काठेवाडी व तत्सम दुग्धव्यावसायिकांची जनावरे वनक्षेत्रात प्रवेश करणार नाहीत. याविषयी त्यांनी सातत्याने सतर्क राहणे आवश्यक आहे.

३. हे आदेश जारी करण्यापूर्वी परराज्यातून प्रवेश केलेली सर्व काठेवाडी आणि तत्सम दुग्धव्यावसायिकांची जनावरे वरील बाबी तपासून त्यांना त्यांच्या मूळ प्रदेशात जाण्याकरीता प्रवृत्त करावे. अन्यथा उपरोक्त तरतूदी विचारात घेऊन कठोर कायदेशिर कारवाई विनाविलंब आखणेत यावी. या कारवाईत महसूल विभाग, गृह विभाग यांचे सहकार्य घेणेत यावे. तसेच जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी समन्वय साधावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.Maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१११२०११६२८२२००१ असा आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(भा. रा. खैरे)
सह सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति,

प्रधान सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम, मुंबई.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक.

सर्व विभागीय आयुक्त.

सर्व जिल्हाधिकारी.

सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) / सर्व मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)

सर्व वनसंरक्षक (वन्यजीव) / सर्व उपवनसंरक्षक (वन्यजीव)

सर्व संचालक/उपसंचालक (पशुसंवर्धन)

कक्ष अधिकारी (पदुम-४), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ (निवडनस्ती).